पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०३८/२०१७
दिनांक : ०५/०८/२०१७

प्रति,

मा......................................
सदस्य, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा दिनांक **११/०८/२०१७** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **११/०८/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ८**

दिनांक : **११/०८/२०१७** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **११/०८/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **१४/०७/२०१७ व २८/०७/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.७)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, पुणे जिल्हा कॅरम असोशिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्रमंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे – ४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जूलै २०१७ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनिषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे – ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१७-१८ (पुरुष गट, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या अंदाजे र.रु.३,८२,९६०/- ( अक्षरी र.रु.तीन लाख, ब्याऐंशी हजार, नऊशे साठ फक्त ) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेस, सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरित र.रु.३,१२,९६०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर्स, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार, इ.निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणे बाबत विचार करणे.

**( दिनांक ११/०८/२०१७ च्या सभेत घेण्याच्या निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२ दि. ०४/०७/२०१२ अन्वये, म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडू करिता खेळाडू दत्तक योजना राबविणे बाबतच्या धोरणास मान्यता दिली असून, सदर खेळाडू दत्तक योजना दि.०४/०७/२०१२ पासून राबविणे बाबत अंमलबजावणी करणेस मान्यता दिलेली आहे. खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ (पाचवी बॅच) अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देऊन दि.२५/०८/२०१६ ते २०/०९/२०१६ या कालावधीत अर्ज मागविले असता एकूण ८९ खेळाडूंचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्या अर्जावर क्रीडा अधिकारी, खेळाडू दत्तक योजना प्रमुख व संबंधित खेळाचे क्रीडा पर्यवेक्षक यांनी प्रस्तावात नमुद प्रमाणे एकूण ८९ अर्जांपैकी ४७ खेळाडूंचे अर्ज पात्र

करून खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ चा लाभ २ वर्षाकरीता देणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या खर्चास र.रु.१,०२,५९,२००/- **(** अक्षरी र.रु.एक कोटी, दोन लाख, एकोणसाठ हजार दोनशे फक्त**)** चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखा शिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, क्रीडा धोरण व सदर आदेशातील अट क्र.१० मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ किंवा १ वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही. असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१५-१६ व २०१६-१७ चे लाभार्थी ३१ खेळाडूंच्या प्राविण्या बाबत संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता ३१ पैकी २१ खेळाडूंनी अर्ज सादर केले आहेत त्यापैकी १२ खेळाडू पात्र असा अहवाल क्रीडा विभागास दिलेला आहे. प्रस्तावात नमुद १२ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१७ – १८ चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या खर्चास र.रू.२३,०१,६००/- ( अक्षरी र.रु.तेवीस लाख, एक हजार, सहाशे फक्त ) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत चालविण्यात येणा-या सार्वजनिक वाचनालयांकरीता मे.हिंदुस्थान प्रकाशन संस्था यांचेकडुन साप्ताहिक विवेक साप्ताहिकांची पाच वर्षासाठी थेट पध्दतीने खरेदी करणेस तसेच त्यासाठी येणारा खर्च र.रु.२०,८००/- ( अक्षरी र.रु. वीस हजार आठशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०३८/२०१७
दिनांक : ०५/०८/२०१७ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.